





दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १७६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०६ फेब्रुवारी २०२५


## थोडक्यात

### कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई


**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.५, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महापालिकेच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकाम विरोधात अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) भरत दोषी, फ्लॅट नं. बी-१३०२, भू.क्र.१७, सेक्टर-१४, कोपरखैरणे, नवी मुंबई येथील अनधिकृत पत्राशेडला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५५ अन्वये नोटीस बजावून हटविण्यात आली. २) अब्दुल अजीज ए. रजाक पटेल, घर नं.२३, खैरणेगाव, तलावाशेजारील अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर तोडक कार्यवाही करण्यात आली व संबधितांकडून अनधिकृत बांधकाम हटविणेपोटी रू. २५,०००/- वसूल करण्यात आले.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनिल काठोळे व विभाग कार्यालयातील (अतिक्रमण विभागातील) अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. मुख्यालय स्तरावरून पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात आलेला होता. तसेच सदर कारवाईसाठी मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर, पिकअप व्हॅन चा वापर करण्यात आला.

### मनसेचे प.न.पा दालनात आमरण उपोषण



**अक्षराज : दत्तात्रय शिंदे**

**दि.०५, खारघर (पनवेल) :** दिव्यांग धोरणा अंतर्गत दिव्यांगांबाबत धोरण स्पष्ट करण्यासाठी मनसेचे पदाधिकारी गणेश बनकर हे गेल्या तीन दिवसापासून पनवेल महानगरपालिका कार्यालयाच्या दालनात आमरण उपोषण करत असून त्यांनी महानगरपालिका आयुक्तांच्याकडे महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग धोरणाची अंमलबजावणी करून दिव्यांग बांधवांना रोजगारक्षम स्टॉलवाटप करावे, अशी त्यांची मागणी आहे. पालिकेच्या माध्यमातन दिव्यांग धोरणाची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत कायदेशीर लढा देऊन बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार बनकर यांनी दिला आहे. या उपोषणाला महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनेचे आरिफ शेख, तानाजी पिसे, भिंगारचे माजी सरपंच दीपक पाटील, सचिन जाधव, सुमित पाटील, दत्ता तरंगे, राहुल गायकवाड, सुनील कोळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

महापालिका दिव्यांग धोरणांतर्गत स्टॉल परवाना देण्याबाबत उचित कार्यवाही करीत असल्याने उपोषण मागे घेण्याची विनंती उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर यांनी बनकर यांना केली आहे. परंतू जोपर्यंत दिव्यांगांणा न्याय मिळणार तो पर्यंत उपोषण कायम ठेवण्यावर बनकर ठाम आहेत.

# ‘एसटी’चा प्रवास महागला, सुरक्षितता जैसे थे !

## प्रवासी शुल्कात १४.१५ टक्क्यांनी वाढ ; सुरक्षिततेच्या उपाययोजनांची हमीच नाही

**अपघाताची कारणे**
- वाहतूक कोंडी
- चालकांचा निष्काळजीपणा
- प्रभावी सुरक्षा आणि प्रतिबंधात्मक योजनांचा अभाव
- आयुर्मान संपलेल्या बस सेवेत




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी शुल्कात वाढ करण्यात आल्याने सामान्य प्रवाशांचा प्रवास महागला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांतील अपघातांची सख्या पाहता प्रवासी असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे विभागांतर्गत मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ पर्यंत तब्बल ३०१ अपघात झाले असून, ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. दोन वर्षांच्या तुलनेत गंभीर अपघातांमध्ये वाढ झाली असून मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही वाढल्याचे समोर आले आहे.

एसटी महामंडळाकडून २५ जानेवारीपासून प्रवासी शुल्कात १४.९५ टक्क्यांनी वाढ लागू केली आहे. मात्र सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत हमी घेतली नसल्याचे दिसून येत आहे. आयुर्मान संपलेल्या बस ग्रामीण भागात चालविल्या जात आहेत. त्यामुळे द्रुतगती महामार्ग, राज्य मार्ग आणि शहरातील अंतर्गत रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण वाढत आहे. मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ या २१ महिन्यांमध्ये पुणे विभागांतील बसचे ३०१ अपघात झाले आहेत. यामध्ये १५० अपघात गंभीर, तर १२६ अपघात किरकोळ आहेत. गंभीर अपघातांचे प्रमाण अधिक असून ३५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. गंभीर अपघातांमध्ये देखील वाढ झाली असून २०२३ अखेरपर्यंत १७ मृत्यू झाले. २०२४ मध्ये गंभीर अपघातांमध्ये वाढ होऊन १८ जण मरण पावल्याचे एसटी महामंडळाच्या आकेडवारीवरून स्पष्ट झाले आहे.

> बसच्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर चालकांची आरोग्य तपासणी, शिबिर आणि वेळोवेळी कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. अपघात झाल्यानंतर संबंधित चालकांना नव्याने आठ ते दहा दिवस प्रशिक्षण देऊन चाचणी घेतली जाते. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहक आणि चालकांना सूचना करण्यात आल्या आहेत. लवकरच जुन्या बस सेवेतून काढून नवीन पर्यावरणपूरक बस विभागाच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने दाखल होणार आहेत.
> **- प्रमोद नेहूल, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, पुणे**

## तिरंदाजीत महाराष्ट्राच्या महिला संघाला रौप्य, अवघ्या एका गुणाने हुकले सुवर्ण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, देहराडून :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तिरंदाजी क्रीडा प्रकारातील कंपाउंड राउंड महिलामध्ये अखेरच्या क्षणा पर्यंत श्वास रोखायला लावणाऱ्या अंतिम लढतीत महाराष्ट्राच्या अदिती स्वामी, मधुरा धामणगावकर, प्रितिका प्रदीप व पुर्वशा शेंडे यांच्या संघास रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. प्रतिस्पर्धी पंजाब संघाने अवघ्या एका गुणाच्या फरकाने बाजी मारत सुवर्णपदकावर नाव कोरले.

डेहराडून येथील मुख्य क्रिकेट स्टेडियममध्ये महाराष्ट्र विरुद्ध पंजाब हा अंतिम सामना अतिशय रंगतदार झाला. हवेच्या वेगात सुवर्णपदकासाठी दोन्ही संघातील तुल्यबळ धनुर्धारी भिडले होते. धनुर्धारींनी मारलेला बाणाचा प्रत्येक वेध आणि त्यास मिळणारा प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे सुवर्णपदकाची लढत डोळ्याची पारणे फेडणारी ठरली. अदिती स्वामी (सातारा), मधुरा धामणगावकर व प्रितिका प्रदीप ( पिंपरी चिंचवड ) व पुर्वशा शेंडे (अमरावती) या महिला संघाने सुवर्ण पदकासाठी सर्वस्व पणाला लावले. मात्र, दोन वेळा मिळालेले ८ गुण महाराष्ट्राला महागात पडले अन् त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

त्याआधी, महाराष्ट्राच्या या महिला संघाने उपांत्यपूर्व सामन्यात उत्तराखंड संघावर २३३-२१४ गुणांनी, तर उपांत्य सामन्यात तेलंगणा संघावर २२९-२२८ गुणांनी मात करत अंतिम फेरी गाठली होती. अंतिम सामना पंजाब संघाने २२९-२२८ गुण फरकाने म्हणजेच एका गुणाने बाजी मारत सुवर्णपदक पटकावले. कंपाउंड महिला संघाचे संघ मार्गदर्शक म्हणून प्रवीण सावंत यांनी यावेळी काम पाहिले.

सुवर्णपदकासाठी खेळत असलेल्या महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे उपाध्यक्ष तथा पथक प्रमुख संजय शेटे, संघ व्यवस्थापक प्रवीण गडदे, संघ मार्गदर्शक प्रवीण सावंत, अमर जाधव, समीर मस्के, कुणाल तावरे आदींसह खेळाडूंची उपस्थिती होती.

> खरं तर आम्ही जोरदार लढत दिली. अवघ्या एका गुणाने हरलो म्हणजे आज नशीब आमच्या बाजूने नव्हते असेच म्हणावे लागेल. पंजाबच्या महिलांनीही चांगला खेळ केला. त्यामुळे त्यादेखील सुवर्ण पदकाच्या हक्कदार होत्या.
> - आदिती गोस्वामी, महाराष्ट्र



## बनावट अस्टर कंपनीमुळे नागरिकांची कोट्यावधी रुपयांची लूट

### सर्वसामान्य जनता भरमसाठ व्याजदराला भुलली...

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.५, सुपा (अ.नगर) :** आजपर्यत महाराष्ट्रात बँका, पतसंस्था पेक्षा ठेवीवर व्याज दर १०% पासुन २५% पर्यत व्याजदर देवू अशी घोषणा देत बाजारात खुलेआम ऑफर देत आल्या. त्या पैकी डझ्छ, डडज, डाबर, बिग हॉट, अशा कंपन्या आल्या आणि कोट्यावधी रुपयाला जनतेला चुना लावुन गेल्या तरी सरकारने त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसत नाही.

आज पारनेर तालुक्यात एका वर्षापूर्वी नव्याने अस्टर म्हणुन एक कंपनी जोमात ६ हजार रुपयाला दिवसातुन दोन वूळेस ५०० रुपये व्याज देत होती. सुपा पंचक्रोशीतील अनेक तरुणवर्ग या कंपनीकडे आकर्षित झाला. दि.४ फेब्रुवारीपासून कंपनी बंद झाली आणि सुपा परीसरातील जनता करोडो रुपयास मुकली.

तरी सरकारने अशा कंपन्या बाजारात येत असतांना त्यांना सरकारचे बंधने असावी अन्यथा पुढील काळात जनता अशा कंपन्याच्या आहारी जाउन शेवटी जनता फाशी घेतल्याचे वृत्त आल्याशिवाय राहणार नाही.

तब्बल एका महिन्यातच सुपा पंचक्रोशीत सिस्पे नावाच्या कंपनीच्या कार्यालयाचे उदघाटन झाले. ही कंपनी बाजारात येउन चार वर्षे झाली. सिस्पे ही कंपनी ही बनावट असु शकते. सिस्पे कंपनीत ही जनतेने कोट्यावधीची गुंतवणूक केल्याचे दिसत आहे, सदर कंपनीला रिझर्व बँकेची अनुमती दिसत नाही, तरी जनतेने अशा बनावट कंपनी मधे कसलीही गुंतवणूक करु नये, असे माहीती सेवा समितीचे राजकुमार इकडे यांनी पत्रकाद्वारे जनतेला सांगितले.

तरी जनतेने अशा बनावट कंपन्या पासुन सावधान राहावे असा सावधगिरीचा इशारा राजकुमार इकडे यांनी परिसरातील जनतेला दिला आहे.

## भातसा धरण कार्यालयाला बाधितशेतकऱ्यांनी ठोकले टाळे

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.५, शहापूर (ठाणे) :** भातसा धरणाच्या बॅक वॉटर भिंतीची उंची २००५ साली वाढविल्यामुळे गेली २० वर्षांपासून धरणाच्या मागील बाजूस असलेल्या मौजे पिंगळवाडी येथील शेतकऱ्यांच्या लागवडीच्या शेत जमीनी पाण्याखाली (बुडीत क्षेत्रात) जात असल्याचे भातसा धरण व्यवस्थापन आणि शासन यांस निदर्शनास आणून दिले.बुडीत क्षेत्रात जात असलेल्या शेत जमिनीचा मोबदला आणि नुकसान भरपाई मिळावी म्हणून भातसा धरण कार्यालया समोर वारंवार आंदोलने करण्यात आली. बाधित शेतकऱ्यांच्या सदर शेत जमीनी ची शासन मोजणी करत नसल्याने आज समाज कार्यकर्ते नितीन देसले यांच्या नेतृत्वात बेमुदत ताळेबंद आंदोलनाची हाक देत पिंगळवाडी येथील शेतकऱ्यांनी भातसा धरण कार्यालयाला टाळे लावत कार्यकारी अभियंता रविंद्र पवार यांचा राजीनाम्याची मागणी केली.

लागवडीची शेत जमीन पाण्याखाली जात असल्याने सर्व जमीन नापिक झाली आहे.शेती हेच उदरनिर्वाह चे मुख्य स्रोत असल्याने आता शेतकऱ्यांच्या वर उपासमारीची वेळ आली आहे.. यामुळे आर्थिक नुकसान भरपाई मिळावी अन्यथा भातसा धरण कार्यालय समोर 'स्वतःला पेटवून आत्महत्या करू 'असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.बुडीत क्षेत्रात ३० हेक्टर पेक्षा अधिक शेत जमीन जात असून २५ शेतकरी बाधित होत आहेत.

## देसवडे परिसरातील बिबट्यांचा तात्काळ बंदोबस्त करा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील देसवडे येथे सोमवारी दि.३ रोजी सकाळी ८:३० वाजता एका शेतकऱ्याला त्यांच्या मुलीला शाळेत घेऊन जात असताना रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात तर एका शेतकऱ्याला रात्री किर्तन संपल्यानंतर उशिरा वारणवाडी देसवडे परिसरात घरी जात असताना भरवस्तीत बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाच्या वतीने तातडीने रेसक्यु ऑपरेशन व इतर काही उपाययोजना करून बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे. काही दिवसांपूर्वी खडकवाडी येथील इयत्ता चौथी शिकणारी ईश्वरी पांडुरंग रोहकले हिचा वाघाच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच देसवडेत पुन्हा एका बिबट्याने शेतकऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडलीय.

योगेश बाबाजी गोळे (वय ३२) यांच्यावर बिबट्याने हल्ला करत जखमी केले आहे. त्यामुळे परिसरात दररोज बिबट्याचा वावर होताना दिसत असल्यामुळे परिसरातील नागरिक भयभित झालेले आहेत. वन विभागाने याची त्वरित दखल घेऊन अजून वाट न पाहता,रेसक्यु ऑपरेशन बिबट्याचा बंदोबस्त करावा. ग्रामीण भागामध्ये शेती पंपांना रात्रीची वीज मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीला रात्रीचे पाणी देने जिक्रीचे झाले आहे. वन विभागाने वेळ न दवडता ताबडतोब बिबट्यांचा बंदोबस्त करावा. अशा मागणीचे पत्र भूमिपुत्र संघटनेच्या वतीने वन विभागाला देण्यात आले आहे या मागणीची तात्काळ दखल घ्यावी अन्यथा भूमिपुत्र संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली कोणत्याही स्वरूपाचे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देसवडे ग्रामस्थांनी दिला आहे.

## संपादकीय



### लतादीदी

लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते. लतादीदी मंगेशकरांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्यप्रदेश- ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला. लतादीदींनी नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या किती हंसाल? या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना नवयुगची पहिली मंगळागौर या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी नटली चैत्राची नवलाई हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ- भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या आपकी सेवा में या हिंदी चित्रपटासाठी पा लागूं कर जोरी हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- बडी माँमध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी माता तेरे चरणों में हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली. इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट महलचे ''आयेगा आनेवाला'' हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. गुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा शहीद या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जींशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, येणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील. त्यांनी लताजींना मजबूर या चित्रपटात ''दिल मेरा तोडा'' हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली.

# गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला.

त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या.

या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल,



करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## न.प.शाळा क्र.११ शाळेचे घवघवीत यश

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०४, धाराशिव :** येथील समता नगरातील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ११ या शाळेतील विद्यार्थ्यांनी व क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.धाराशिव शहरातील नगर परिषद शाळा क्रमांक ११ मधील विद्यार्थिनी खोखो स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच थ्रो बॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने द्वितीय व क्रिकेटमध्ये मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. वैयक्तिक क्रीडा प्रकारात आलिया फारुख मुजावर हिने १०० मीटर धावण्याच्या प्रथम तर मोठ्या गटात ऐश्वर्या राम घोडके या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक तसेच २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तस्मिया फारूक मुजावर हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

### शाहीस्नान..

कुंभ मेळ्यात नेते
करती शाही स्नान
कडेकोट बंदोबस्त
जपायचा मानपान

महायोगपुण्यलाभ
परिपूर्ण हो सपान
सहज घडे सत्कर्म
दुष्कर्म ते अस्तमान

भाव भक्ती श्रध्देचा
न व्हावा अकमान
शुचिर्भूत अंतर्बाह्य
मन करे आरस्पान

शरीरासहीत करावे
बुध्दी अभ्यंग स्नान
जपायचेआरोग्यांस
करताना उदकपान

पावित्र जपा नदीचे
किटाणूंचे जायमान
परंपरामागचे शास्त्र
अमोल दैदिप्यमान

इव्हेंट न प्रसिद्धीचा
भाव हवा दृश्यमान
स्पर्श राजकारणाचा
न पावनता अंतर्धान

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# 'व्हॅलेंटाईन वीक' की स्वैराचाराला मोकळीक ?

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.



काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ?

'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.

या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## गुन्हेगार झाले की, पोलीस येणार शालेय विद्यार्थ्यांना समुपदेशातून पोलिसांकडून सूचना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, पुणे :** येरवडा पोलीस ठाण्यातर्फे सुरू करण्यात आलेल्या विद्यार्थी समुपदेशन अभियान अंतर्गत महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड येथील गेंनबा सोपानराव मोझे कनिष्ठ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या मार्गदर्शन शिबिरात प्रमुख वक्ते म्हूणन पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, व महेश महेश फटांगरे, बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक लक्ष्मण यादव, जालिंदर भागवत पर्यवेक्षक मारुती दसगुडे सर्व पदाधिकारी व शिक्षक आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक सुर्वे म्हणाले विद्यार्थी जीवनात विद्यार्थी होऊनच जगलं पाहिजे. विद्यार्थी दशेत भरपूर वाचन करून जीवनात यशस्वी व्हावे. आज सर्वत्र सोशल मीडियाचा अतिरेक वाढल्याने समाजाला अनेक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थिनींनी स्वतःचे संरक्षण करण्यास शिकले पाहिजे. चुकीची संगत आणि खोट्या आमिषांना बळी पडू नये.

विद्यार्थ्यांचे वाढते गुन्हेगारीकडे पाऊल पडत असल्यास विद्यार्थी म्हणून त्याला क्षमा केले जाणार नाही कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येईल. गेनबा मोझे या शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी कडून मारामारीचे देखील काय व्हिडिओ व्हायरल होत आहे. विषय चिंताजनक आहे. विद्यार्थिनींनी आपल्यावर होणाऱ्या अत्याचार आणि अन्यायाबाबत तत्काळ शाळा मुख्याध्यापक अथवा पोलिसांना कडे तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपनिरीक्षक महेश फटांगरे यांनी केले. मुख्याध्यापक भागवत यांनी प्रास्ताविक केले संबंधित पोलिसांचे आभार देखील मानले. विद्यार्थ्यांना पोलिसांचे समुपदेशन ची गरज असल्याने पोलीस उप-आयुक्त (परिमंडल -४) हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार येरवडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे ,महेश फटांगरे, पो.ह.जगदाळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना चांगलेच समुपदेशन दिले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# महावितरणच्या योजनांना गती द्यावी - खासदार लंके

## केंद्रीय स्थायी उर्जा समितीची बैठक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** महावितरण अंतर्गत असलेल्या केंद्र सरकारच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत सुरू असलेल्या योजनांना गती द्यावी अन्यथा संबंधित ठेकेदारास ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे. अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय स्थायी ऊर्जा समितीच्या बैठकीत केली. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये ऊर्जा क्षेत्राविषयी नवीन ध्येय धोरणे ठरविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. खासदार लंके यांनी समितीचे सदस्य या नात्याने नगर दक्षिण मतदार संघातील महावितरणच्या विविध विषयांवर समितीचे लक्ष वेधले. खासदार निलेश लंके म्हणाले, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाती केंद्र सरकारच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत १८६ फीडरचे काम सुरू आहे. हि योजना केंद्र सरकारच्या सुधारीत वितरण क्षेत्र योजनेचा सहभाग आहे. वीज वितरण कंपन्यांच्या कार्यक्षमता व आर्थिक स्थैर्य सुधारण्याचा त्यामागे उद्देश आहे. नुकसान कमी करणे, पायाभूत सुविधा अद्ययावत करणे, विश्वासार्ह वीज पुरवठा सुनिश्चित करणे यावर या योजनेत भर देण्यात आलेला आहे. तसेच त्यात एचटी व एलटी लाईन विस्तारित करणे,पोल उभारणे, नवे ट्रान्सफॉर्मर बसविणे व त्या अनुषंगाने सध्या कामे सुरू आहे. ही कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले. केंद्रीय निधी अंतर्गत कर्जत तालुक्यातील राजापूर, एरंडोली , पारनेर तालुक्यातील भाळवणी, पळवे तसेच अहिल्यानगर शहरातील सारसनगर, सावेडी या ठिकाणी सब स्टेशन प्रस्तावित आहे. हे कामे लवकरात लवकर सुरू करावीत व ती वेळेत, गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असावी.

> केंद्र सरकारच्या आरडीएसएस योजनेतून अहिल्यानगर जिल्ह्यात ३ हजार ३७४ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये वीज वितरणाच्या पायाभूत सुधारणा, स्मार्ट मिटरींग आणि इतर संबंधित उपक्रमांचा समावेश आहे. कामे केवळ १८ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. २ वर्षात १० टक्के ही काम पूर्ण झालेले नाही.
>
> **- निलेश लंके, खासदार**

# उघड्या डोळ्यांनी स्वप्न पाहा अन् यशाचे शिखर गाठा - सिताराम खिलारी

## ढोकेश्वर विद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यशाचे शिखर गाठायचे असेल तर उभ्या आयुष्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी. यासाठी मोठी स्वप्न पाहावीत, मात्र ती उघड्या डोळ्यांनी पाहताना प्रत्यक्षात आणि वास्तवात साकारता येणारी असावीत. यातून यशाचे शिखर गाठता येते, असे आवाहन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील श्री. ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १२ वी कला आणि सायन्स च्या निरोप समारंभात ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिताराम खिलारी होते. कु.अंकिता खराबी, कु.ऋतुजा गुंजाळ, कु. ज्ञानेश्वरी झावरे, कु.सायली माकरे, कु. शुभम कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील काही अनुभव सांगितले. शास्त्र विभाग समन्वयक अशोक गांगड, कला विभाग समन्वयक विजय सोबले यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पुढे सिताराम खिलारी म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवनात नेहमीच सकारात्मकता अंगी बाळगायला हवी. आत्मविश्वास ठेवायला हवा. जीवनात शिस्त, संस्कार, आचार, विचार असायला हवेत. शिक्षणातून समाजात परिवर्तन घडते. मनात जिद्द, चिकाटी व परिश्रम करण्याची तयारी ठेवल्यास निश्चित यशाचे शिखर गाठता येते, असे बोलताना खिलारी यांनी सांगितले. कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य सुनील वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, शिवाजी नरसाळे, गोवर्धन मते, अशोक वाघ, पोपटराव जगदाळे, अतिष झावरे, सुनील झावरे, अनिकेत बांगर, रामदास नरवडे, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, सुंबे, योगेश मांडगे, भाऊसाहेब खोसे,यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र ढोणे यांनी केले तर आभार प्रदर्शन मिना खाडे यांनी मानले.

# शिकार की अपघात? – गावठी कट्ट्यांच्या अवैध वापरामुळे दोन जणांचा मृत्यू!

## आठ दिवसांनंतर उघडकीस आलेली घटना, पोलिसांना गुप्तता राखणाऱ्या शिकारी टोळीचा शोध

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.५, पालघर :** रानडुकराची शिकार करताना चुकून झाडलेल्या गोळीमुळे दोन जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना पालघर तालुक्यातील बोरशेती जंगलात घडली आहे. विशेष म्हणजे, ही घटना तब्बल आठ दिवस गुप्त ठेवण्यात आली होती. एका मृतदेहावर जंगलातच अंत्यसंस्कार करण्यात आले, तर दुसऱ्याच्या मृत्यूची माहिती लपवण्यात आली. मात्र, घटनेची माहिती बाहेर आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या प्रकरणात गावठी कट्ट्यांचा सर्रास वापर होत असल्याचे उघड झाले असून, जंगलातील शिकारींच्या टोळ्या कायद्याला धक्का देत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



२८ जानेवारी रोजी बोरशेती, किराट, रावते आणि आकोली गावांतील १०-१५ जणांनी मिळून रानडुकराची शिकार करण्याचा निर्णय घेतला. पूर्ण तयारीनिशी हे शिकारी जंगलात गेले. बोरशेतीच्या जंगलातील आंब्याचे पाणी या ठिकाणी मोठे रानडुक्कर आणि पट्टेदारी वाघ पाणी पिण्यासाठी येतात, ही माहिती या शिकाऱ्यांना होती. त्यामुळे काही जण डोंगराच्या कड्यावर आणि काही जण झाडांवर लपून बसले.

अमावास्येची रात्र असल्याने जंगलात मिट्ट काळोख होता. याचवेळी काही शिकारी जंगलात उशिरा पोहोचले. त्यांनी मोबाईलचा टॉर्च किंवा बॅटरी न लावता शांततेत पुढे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, अंधारात हालचाल झाल्याचा संशय आल्याने एका शिकाऱ्याने गोळी झाडली. ही गोळी थेट रमेश जन्या वरठा (६०, रा. बोरशेती) यांच्या छातीवर लागली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. हीच गोळी तडाखा देऊन पुढे जाऊन महालोडा नामक दुसऱ्या शिकाऱ्याच्या पायात घुसली.

घटनेनंतर भीतीने थरथरलेल्या शिकारींनी रमेश वरठा यांचा मृतदेह जंगलात गाडून ठेवण्याचा निर्णय घेतला. जखमी महालोडाला त्याच्या घरी नेण्यात आले. मात्र, गुप्तता राखण्यासाठी त्याला कोणत्याही रुग्णालयात नेण्यात आले नाही. परिणामी, ३१ जानेवारी रोजी त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्यावरही गुपचूप अंत्यसंस्कार करण्यात आले. ही घटना तब्बल आठ दिवस गुप्त ठेवण्यात आली. मात्र, ४ फेब्रुवारी रोजी स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत जंगलात गाडलेल्या रमेश वरठा यांचा मृतदेह ताब्यात घेतला. या घटनेने पालघर तालुक्यात मोठ्या प्रमाणात गावठी कट्ट्यांचा अवैध वापर होत असल्याचे उघड झाले आहे. शिकारीच्या नावाखाली अशा प्राणघातक शस्त्रांचा वापर सुरू असून, कायद्याची कोणतीही भीती राहिलेली नाही. पोलिसांनी या प्रकरणात आठ जणांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.

बोरशेतीच्या जंगलात मोठे रानडुक्कर आणि पट्टेदारी वाघ असल्याने तेथे शिकारीसाठी मोठी मागणी असते. स्थानिक शिकारी अनेकदा या भागात अवैध शिकार करत असतात. आंब्याचे पाणी हे जंगलातील एक प्रसिद्ध ठिकाण असून, प्राण्यांना पाणी पिण्यासाठी येण्याच्या वेळा शिकाऱ्यांना माहित असतात. त्यामुळेच येथे मोठ्या प्रमाणावर अवैध शिकारींचे जाळे तयार झाले आहे.

या घटनेत आणखी किती जण सामील होते? गावठी कट्टे कोठून आले? अवैध शस्त्रांचा वापर कसा आणि कुठे होतो? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. प्रशासनाने या प्रकाराला गांभीर्याने घेतले नाही, तर जंगलात अवैध शिकार आणि गावठी शस्त्रांचा धोका आणखी वाढू शकतो.

# टाकळीढोकेश्वर परिसरात आंब्याचा मोहोर बहरला

## यंदा लवकरच फळांच्या राजाची चव चाखता येणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील गावरान आंब्याला यंदा चिक्कार मोहोर बहरला असल्याने फळांचा राजा आंबा या वर्षी मोठ्या प्रमाणात येणार असल्याची ही चाहुलच आहे. पाऊसकाळ मोठा झाल्याने आंब्याच्या झाडाला मोहोर बहरून गेला आहे.



यावर्षी तिखोल, काकणेवाडी, कासारे, सावरगाव, वनकुटे, ढवळपूरी,वासुंदे टाकळी ढोकेश्वर परिसरातील अतिशय जुनाट गावरान आंब्याची झाडे असून ते मोहराने बहरले आहे. त्याचा फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. अहिल्यानगर जिल्ह्यात साधारण तीस हजार हेक्टरपेक्षा अधिक आंब्याचे क्षेत्र आहे.

अलीकडच्या काळात शेतकरी आंबा लागवडीला प्राधान्य देत आहेत. कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून फळबाग लागवडीसाठी अनुदान घेणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांनी गेल्या चार वर्षांचा विचार केला तर आंबा लागवडीला प्राधान्य दिले आहे. गुणवत्तापूर्ण हापूस उत्पादनासाठी काटेकोर व्यवस्थापनावर भर त्यामुळे आंब्याचे क्षेत्र वाढत असून त्यातही केसर आंब्याची अधिक लागवड झाली आहे. चार ते पाच वर्षांपूर्वी लागवड केलेल्या झाडांना आता मोहर आला आहे.

गेल्या वर्षी धुके, ढगाळ वातावरणामुळे रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने मोहराचे नुकसान झाले होते. त्यामुळे गतवर्षी आंबा उत्पादनावरही परिणाम झाल्याचे शेतकरी सांगतात. यंदा आंबा मोहोर चांगला आला आहे. गेल्या महिनाभरात थंडी टिकून होती. शिवाय धुक्याचे प्रमाण अल्प असल्याने मोहरला पोषक वातावरण आहे. अशीच स्थिती राहिली तर आंब्याचे उत्पादन यंदा चांगले असेल असे शेतकरी सांगतात.

# थोडक्यात

## योगासनात महाराष्ट्राच्या महिलांना सुवर्ण




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, उत्तराखंड :** महाराष्ट्राच्या महिलांनी उत्कृष्ट समन्वय दाखवीत ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील योगासनात सांघिक सुवर्णपदकाची बाजी मारली.सुवर्णासह एक रौप्य व एक कांस्यपदक ही जिंकले. हेमवतीनंदन बहुगुणा स्टेडियमवर आयोजित करण्यात आलेल्या योगासन स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या सुहानी गिरीपुंजे, छकुली सेलोकर, तन्वी रेडीज, रचना अंबुलकर व पूर्वा किनरे यांनी ११२.१३ गुण नोंदवीत सुवर्णपदक जिंकले. या खेळाडूंनी त्यांना दिलेल्या मर्यादित वेळेमध्ये अतिशय विलोभनीय रचना सादर केल्या त्यामुळे परीक्षकांनी त्यांना सर्वोत्तम गुण बहाल केलेच पण प्रेक्षकांनी ही त्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

पुरुषांच्या कलात्मक वैयक्तिक विभागात सोलापूरचा रुपेश सांगे याला रौप्य पदक संपादन केले. अटीतटीच्या लढतीत त्याने देखील अतिशय सुरेख रचना सादर केल्या होत्या अखेर त्याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले त्याने ११७.८८ गुणांची कमाई केली. सुहानी हिने पारंपारिक योगासनामध्ये कांस्यपदक पटकावित आपल्या नावावर आणखी एक पदक नोंदविले. नागपूरच्या या खेळाडूने या क्रीडा प्रकारात ६०.५८ गुणांची नोंद केली. महाराष्ट्राच्या रुपेश सांगे, सागर शितकर, प्रणय कांगळे, सिद्धेश राहते व वैभव देशमुख यांनी योगासनामधील पुरुषांच्या कलात्मक सांघिक प्रकारामध्ये कांस्यपदक जिंकले.

## दोन शब्दांचा आधार देखील माणसाला जगण्याचे बळ देते - डॉ.पी.एन.शिंदे



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०४, पाटण (सातारा) :** स्वातंत्र्य सैनिक बाळासाहेब पाटणकर उर्फ भाई भडकबाबा स्मृती दिनानिमित्त १० वे साहित्य संमेलन व ग्रंथ महोत्सव पाटण येथे उत्साहात पार पडला. प्रारंभी श्रीदत्त मंदिर पाटण येथून मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी अहिल्याबाई होळकर साहित्य नगरी पर्यंत आयोजित करण्यात आली. साहित्य संमेलन ठिकाणी या ग्रंथदिंडीचे स्वागत करण्यात आले. तदनंतर या साहित्य संमेलनाचे प्रमुख डॉ.पी.एन.शिंदे, डॉ.संदिप श्रोत्री, पी.एस.पाडवी, विक्रमबाबा पाटणकर नंदकुमार सुर्वे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. यावेळी इतिहास तज्ञ, लेखक डॉ.पी.एन.शिंदे आपल्या प्रखर मुलाखतीत बोलताना म्हणाले आपल्याकडं जे ज्ञान आहे, अनुभव आहेत. ते समाजा पुढे मांडा. दु:खद प्रसंगी दोन शब्दांचा आधार देखील माणसाला जगण्याचे बळ देते. समाजाचे सामाजिक ऋण फेडणे महत्वाचे आहे. रडत रडत जगलात तर तूम्ही समाजाचे शत्रू ठराल. ग्रंथालय हि ज्ञान मंदिरे आहेत ही ज्ञान मंदिरे नेटकी आणि सुलभतेची असावीत ग्रथांलयात येणाऱ्यांना सहकार्य करा. जुने कागदपत्रांचे अजूनही संशोधन होणे गरजेचे आहे. इतिहास लिहिताना लेखकाने आपली पाटी स्वच्छ ठेवून लिहावे. जे संदर्भ पुरावे मिळतील त्या अधारे लिहावे. पक्षपाती लिखाण टाळले पाहिजे. इतिहास लिहिणे सद्या जोखमीचे काम.. जिथे ऐतिहासिक खजिना आहे तिथे संशोधकांची राहण्याची व्यवस्था करा. तिथे इतिहास संशोधक येवून अभ्यास करतील. असे सांगताना माणसांनी सेवानिवृत्त होण्याअगोदर आपण पुढे काय केले पाहिजे हे ठरविले पाहिजे. आपण नेहमी कामात व्यस्त राहिले पाहिजे. असे सांगितले. यावेळी ॲड. सौरभ देशपांडे यांनी त्यांची मुलाखत घेतली. यावेळी निसर्ग व पर्यावरण अभ्यासक डॉ.संदिप श्रोत्री म्हणाले सातारा जिल्ह्याला नुसता भुगोल नाही तर त्याला इतिहास देखील आहे. सह्याद्रीच्या कडे कपारी ऐतिहासिक गडकिल्ले, ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण व जतन होणे आवश्यक आहे. अशा ऐतिहासिक स्थळांच्यावर अभ्यास करून साहित्यिक रुपाने संशोधन होणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदकुमार सुर्वे म्हणाले ज्ञानाला सर्वात जास्त महत्व दिले पाहिजे. ज्ञानातून अहंकार निर्माण झाला तर ज्ञानाचे विष तयार होते. ज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे याचा अहंकार न बाळगता पसरवीत राहिले पाहिजे तरच या ज्ञानाचा सदुपयोग होईल असे त्यांनी सांगितले. यावेळी श्रोते, साहित्य प्रेमी, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नृत्यकला अविष्काराने जिंकली उपस्थितांची मने



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०४, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळाच्या विद्यार्थिनींनी लोणंद येथील शरद कृषी महोत्सव-२०२५ मधील युवा महोत्सवात दि.०४ फेब्रुवारी २०२५ रोजी कलाविष्काराचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी सोनावणे, श्रेया क्षीरसागर, पायल सुतार सर्व बीकॉम भाग-०१, समीक्षा भोसले बीकॉम भाग-०२ विद्यार्थिनींनी गजवंदना आणि राज आलं राज आलं जी... या गाण्यांवर नृत्यकला सादर केली. याबद्दल सर्व विद्यार्थिनी व मार्गदर्शक महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.रोहिणी स्वप्नील मोरे यांचे सर्व महाविद्यालय प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

आमदार रोहित पवार, खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सचिव अनिरुद्ध शंकरराव गाढवे, शरद कृषी महोत्सव आयोजक डॉ.नितीन सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करत गौरविण्यात आले. शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे, प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, प्राचार्य शब्बीर नालबंद, प्राचार्य जयवंत जगताप, राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी वृंद यांचेकडून कौतुक व शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.